मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विधानसभा विजयासाठी आतापासूनच कामाला लागा – खासदार मेधा कुलकर्णी

## शहर भाजपाची विस्तारित जिल्हा कार्यकारिणी अधिवेशन संपन्न : भाजपाला थांबविण्यासाठी विरोधकांकडून जोरदार ताकद लावली जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजपाला थांबविण्यासाठी विरोधकांकडून जोरदार ताकद लावली जात आहे, सर्वाधिक वेळा काँग्रेसच्या काळात संविधानात बदल झाले. वक्फ बोर्डाला सर्वाधिक पॉवर देण्याचा शेवटचा बदल काँग्रेसने २०१३ साली केला. संविधान बदलण्याची भाषा वापरून काँग्रेस फेक नरेटिव्ह पसरविण्याचे काम करीत आहे, त्यांना त्याच ताकदीने उत्तर देण्याची गरज आहे. त्यामुळे पुढील दोन तीन महिन्यांच्या कालावधीत गाफील न राहता जिद्दीने निवडणुका जिंकण्यासाठी कामाला लागा, असे आवाहन राज्यसभा खासदार प्रा.डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. आगामी विधानसभा निवडणुकीत शहरातील तीनही मतदारसंघात महायुतीच्या विजयासाठी मंथन करण्याकरिता भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)च्यावतीने विस्तारित जिल्हा कार्यकारिणी अधिवेशन आज प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्यावेळी उपस्थित जिल्हा पदाधिकारी – मंडल अध्यक्ष, बुथ प्रमुख यांना मार्गदर्शन करतात त्या बोलत होत्या.



यावेळी, पश्चिम महाराष्ट्र मकरंद देशपांडे, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार विधान परिषद उमाताई खापरे, आमदार महेशदादा लांडगे, चिंचवड विधानसभा अश्विनीताई जगताप, प्रदेशअध्यक्ष भाजयुमो अनुप मोरे, राष्ट्रीय परिषद सदस्य सदाशिव खाडे, माजी महापौर उषा ढोरे, राहूल जाधव, दक्षिण भारत प्रकोष्ठ राजेश पिल्ले, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शितल शिंदे, शैला मोळक, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, चिंचवड विधानसभा विस्तारक काळूराम बारणे, भोसरी विधानसभा विस्तारक विकास डोळस, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापूरे, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, संदिप नखाते, प्रसाद कस्पटे, राजेंद्र बाबर, निलेश अष्टेकर, संतोष तापकीर, रामदास कुटे यांच्यासह भाजपाचे प्रदेश पदाधिकारी, माजी नगरसेवक – नगरसेविका, जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चा, आघाडी, प्रकोष्ठ प्रमुख, मंडल अध्यक्ष, मंडल पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बुथ प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रगीत, दिप प्रज्वलन करून भाजपच्या जिल्हा विस्तारीत कार्यकारिणी अधिवेशनाला सुरुवात झाली. तसेच, शोकप्रस्ताव मांडण्यात आला. अधिवेशनाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीचा आढावा मांडताना पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा कार्यक्षेत्रात भारतीय जनता पक्षाची ताकद वाढली असून, आगामी विधानसभा निवडणूकीतही पक्षाची संपूर्ण ताकद पणाला लावून महायुतीच्या तीनही उमेदवारांना विजयी करणार असल्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. महिला सबलीकरणासाठी महायुती सरकारने योजना आखल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी १ कोटी ३३ लाख महिला भगिनी योजनेस पात्र ठरल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरातून या योजनेसाठी सर्वाधिक अर्ज भरण्यात आले आहे. महिला भगिनींसाठी महायुती सरकारने आणलेल्या लाभाच्या योजना बंद करण्याचा काँग्रेसचा डाव आहे. अभ्यास न करताच विरोधक बोलतात आणि महायुतीच्या योजनांवर आपले स्ट्रीकर लावतात. विरोधकांकडून सूरू असलेल्या निगेटीव्ह नरेटिव्हला प्रत्येकाने उत्तर देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी, विधान परिषद आमदार अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, पिंपरी विधानसभा विस्तारक संजय मंगोडेकर यांची निवड झाल्याबददल अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला. आमदार महेश लांडगे, माजी खासदार अमर साबळे, आमदार उमाताई खापरे, आश्विनीताई जगताप, सदाशिव खाडे, राजेश पिल्ले यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन केले. तसेच, महाराष्ट्र शासनाने केलेल्या मागासवर्गीय योजना, लाडकी बहिण योजना, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये भाजपाने केलेली विकासकामे, नव मतदार नोंदणी अभियान आदी विषयांवर विस्तृत चर्चा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मंगोडेकर, अजय पाताडे यांनी केले. आभार राजू दुर्गे यांनी मानले.

# अधिकारी कर्मचा-यांनी घेतली तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ मुक्ततेची शपथ

## स्वातंत्र्यदिनानिमित्त अधिकारी कर्मचा-यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ मुक्ततेची शपथ घेतली, तंबाखू व्यसनमुक्तीचा निर्धार केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनानिमित्त अधिकारी कर्मचा-यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ मुक्ततेची शपथ घेतली. तंबाखू व्यसनमुक्तीचा निर्धार केला. स्वातंत्र्यदिनानिमित्त महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रांगणात पार पडलेल्या राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमात अधिकारी आणि कर्मचा-यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत “आम्ही शपथ घेतो की, आम्हाला तंबाखू, जर्दा, खर्रा तसेच बिडी, सिगारेट, ई हुक्का, ई सिगारेट यांच्या दुष्परीणामांची जाणीव आहे. म्हणून आम्ही जन्मभर, या व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करीत आहोत. आमचे कार्यालय, आमचे घर, आणि आमचे परिसर तंबाखूमुक्त रहावेत, तसेच इतरांनी तंबाखूजन्य पदार्थांचा परित्याग करावा, यासाठी आम्ही प्रयत्न करू. भारत सरकारच्या, 2003 च्या तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू. आमच्या अधिपत्याखालील व जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्था, शाळा व शासकीय कार्यालये तंबाखूमुक्त तसेच ई सिगारेटमुक्त करू. आम्ही, आमचे कार्यालय, आमचे घर, आमचे गाव, आमची शाळा, आमची संस्था आणि, आमचा महाराष्ट्र तंबाखू मुक्त करण्याचा प्रयत्न करू ” अशी शपथ घेतली.



यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रवीण जैन, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, संजय खाबडे, प्रमोद ओंभासे, उपआयुक्त विठ्ठल जोशी, संदीप खोत, मनोज लोणकर, अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, राष्ट्रीय कार्यक्रमाच्या डॉ.अंजली ढोणे, डॉ. राजेंद्र वाबळे, डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ.तृप्ती सागळे, डॉ.ऋतुजा लोखंडे, तसेच पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत उर्फ बबन झिंजुर्डे आणि विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# नाना काटे यंदा आमदार होणारच – पार्थ पवार

## नाना काटे यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी पार्थ पवार बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवडमधून आम्ही विठ्ठल उर्फ नाना काटे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. नाना आमदार झाले पाहिजे अशी येथील नागरिक, पदाधिकारी आणि सर्व कार्यकर्त्यांची इच्छा आहे असे राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार म्हणाले. यासाठी आम्ही चिंचवड मतदार संघात मोर्चेबांधणी केली आहे असेही पवार म्हणाले. नाना काटे यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पार्थ पवार बोलत होते. कार्यक्रमाला खासदार श्रीरंग आप्पा बारणे, माजी महापौर संजोग वाघिरे, नितीन आप्पा काळजे, अखिल भारतीय राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष धीरज शर्मा, माजी उपमहापौर प्रभाकर वाघिरे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेना शहर प्रमुख सचिन भोसले



(उबाठा) , युवक शहर अध्यक्ष शेखर काटे, राष्ट्रवादी कॉंग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष विद्यार्थी धीरज शर्मा, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, माजी नगरसेवक श्रीधर बापू वाल्हेकर, प्रवीण भालेकर, राजेंद्र जगताप, सुषमा तनपुरे, संतोष कोकणे, विनोद नढे, जितेंद्र ननावरे, हरीश तापकीर, बाबुराव शितोळे, मयूर कलाटे, राहुल भोसले, सीमा सावळे, नारायण बहिरवाडे, मोरेश्वर भोंडवे, माउली सूर्यवंशी तसेच रांका ज्वेलर्सचे फत्तेचंद रांका, फजल शेख, कांतीलाल गुजर, दिलीप आप्पा काळे, नवनाथ नढे, वर्षा जगताप, शाम जगताप, विशाल वाकडकर, विशाल काळभोर, विनायक रणसुंभे, इम्रान शेख, संदीप जाधव, सतीश दरेकर, राजेंद्र साळुंके, संतोष लांडगे आदी उपस्थित होते.

### चक्क 10 लाख रूपयाचा अपघाती विमा!

» नगरसेविका शितल काटे व नाना काटे सोशल फाऊडेशनच्या वतीने पिंपळे सौदागर, रहाटणी, थेरगाव, काळेवाडी येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक रक्तदात्यास १० लाख रूपयाचा अपघाती विमा देण्यात आला.

चिंचवड विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीत नाना काटे अगदी थोड्या फरकाने पराभूत झाले. मात्र पराभूत झाल्यानंतरही मतदारसंघाकडे त्यांनी अतिशय बारकाईने लक्ष ठेवत काम केले आहे आणि करत आहेत. त्यांनी आमदार व्हावे अशी येथील नागरिकांची इच्छा आहे. यासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी हे देखील नाना आमदार व्हावेत यासाठी प्रयत्न करणार आहेत . त्यामुळे यंदा नाना आमदार होणारच असे पार्थ पवार म्हणाले. भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन.. वाढदिवसाच्या निमित्ताने शाम जगताप व तानाजी जवळकर याच्या वतीने महाराष्ट्राची लोकधारा हा कार्यक्रम, निळु फुले सभागुह येथे घेण्यात आला. यानिमित्ताने आरोग्य सफाई कर्मचारी यांना रेन कोट, जेष्ठ नागरिकांना छत्री, शालेय विध्यार्थी यांना शालेय वस्तुचे वाटप करण्यात आले. बाळासाहेब पिल्लेवार व नाना काटे मित्र परिवार यांच्या वतिने नाना काटे यांच्या हस्ते औधं जिल्हा रूगणालय येथे रूग्णाना फळे व उपयोगी वस्तुचे वाटप करण्यात आले. सचिन वाल्हेकर याच्या वतीने वाल्हेकरवाडी चिंचवडेनगर व परिसरात मोफत आरोग्य व रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

# गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्यदीनानिमित्त ध्वजारोहन

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांसाठी विविध उपक्रम उत्साहात



**पुणे | प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वतंत्र भारताचा ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी संस्थेचे मानद संचालक योगेश भोंगाळे, संचालिका. कविता कडू-पाटील, विश्वस्त,सरिता विखे,मुख्य कार्यकारी अधिकारी, विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका प्रिया नेवाळे, अश्विनी काळे, उपमुख्याध्यापक ज्योतिबा सुरवसे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष संतोष बोराटे, नितीन चासकर, उपसचिव अभिजीत तापकीर आदी मान्यवर उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी प्रमुख अतिथिंचे स्वागत कवायत संचलनाने व ढोल ताशाच्या गजरात केले. योगेश भोंगाळे यांच्या हस्ते ध्वजारोहन झाल्यानंतर उपस्थित सर्वांनी राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली. तसेच राष्ट्रगीत व ध्वजगीताचे समूहगान केले. संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत, आपले काम प्रामाणिक पणे करणेच खरी देशसेवा आहे असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

आत्मविकासातून राष्ट्रविकास घडविणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी दैनंदीन अध्ययनासोबतच स्वतःच्या व्यक्तीगत विकासाकडे लक्ष द्यावे तरच उज्वल भारताचे स्वप्न साकार होईल सा संदेश संस्थेचे मानद संचालक श्री. योगेश भोंगाळे यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार शिक्षक चरण खताळ यांनी केले

# स्वातंत्र्यदिनी 'पार्श्व प्लॅटीनम' ने केला हरीत सोसायटीचा संकल्प

## वृक्षारोपण करून समाजाला पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले



**पुणे | प्रतिनिधी**

स्वतंत्र भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगष्ट रोजी पार्श्व प्लॅटीनम सोसायटीतील सदस्यांनी हरीत आणि पर्यावरणपूरक सोसायटीचा संकल्प केला. संकल्प केल्यानंतर सोसायटीमध्ये वृक्षारोपण करून जनजागृती करण्यात आली. ध्वजारोहण आणि राष्ट्रगीत झाल्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. चिमुकल्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी वक्तृत्व, गायन, संस्कारवर्ग घेण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा.



नगरसेविका साधना मळेकर, सोसायटीचे अध्यक्ष गणेश शिंदे, सचिव राजकुमार काळे, खनिजदार संगीता शिंदे यांच्यासह सोसायटीतील सदस्य उपस्थित होते. सोसायटीतील सर्व सदस्यांनी एकी हेच बळ असून, सर्वांनी एकत्रित आल्यास सर्व गोष्टी शक्य असल्याचे दर्शविले. आपले घर, सोसायटी, परिसर मग शहर स्वच्छ करून हरीत करण्यासाठी पुढाकार घेऊ असा संकल्प यावेळी केला.

# रक्तदान महायज्ञातून स्वातंत्र्यवीरांना अभिवादन

## चिंचवड विधानसभा मतदारसंघात 1200 हून अधिक जणांनी केले रक्तदान : प्रत्येक रक्तदात्याला मिळाले 6 लाखांचे सुरक्षा कवच



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात स्वातंत्र्य दिनानिमित्त राहुल कलाटे फाउंडेशनच्या वतीने 'रक्तदान महायज्ञ'चे आयोजन करण्यात आले होते. या भव्य रक्तदान शिबिरात १२०० हून अधिक जणांनी रक्तदान करत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या शिबिरात रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला ६ लाखांचे सुरक्षा कवच देखील देण्यात आले आहे. राहुल कलाटे यांनी राबवलेल्या या अनोख्या उपक्रमाचे सर्व मतदारसंघात कौतुक होत आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघात राहुल कलाटे फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त 'रक्तदान महायज्ञ'चे आयोजन करण्यात आले होते. चिंचवड मतदार संघात विविध ठिकाणी या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच सर्वत्र रक्तदात्यांनी गर्दी केली होती. या रक्तदान शिबिराला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

यावेळी रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास ३ लाखांचा अपघाती विमा आणि ३ लाखांचा जीवन विमा देण्यात काढून देण्यात आला आहे. तसेच प्रत्येक रक्तदात्यास आजीवन मोफत रक्त देण्यात येणार असून रक्तदात्याच्या नातेवाईकास एक वर्ष मोफत रक्त देखील दिले जाणार आहे.

राहुल कलाटे म्हणाले की, जगातील सर्वोत्कृष्ट दान म्हणजे रक्तदान होय. रक्तदान केल्याने अनेकांचे प्राण वाचवले जाऊ शकतात. रक्तदान केल्याने आपण एका बाजूला व्यक्तीचा जीव ही वाचवतो आणि दुसऱ्या बाजूला आपल्याला एक आत्मिक समाधान ही मिळते. काही आरोग्य तज्ज्ञांच्या मते रक्तदान केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. त्यामुळे, रक्तदान करण्यासाठी सर्वांनी पुढे यायला हवे. राहुल कलाटे फाउंडेशनच्या हाकेला नागरिकांची उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे. या शिबिरात मोठ्या संख्येने चिंचवडवासियांनी रक्तदान करून स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली आहे, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

### रक्तदान केले म्हणून विमा

» रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास सहा लाखांचे विमा कवच देण्यात आले. तीन लाखांचा अपघात विमा, तीन लाखांचा जीवन विमा, रक्तदात्यास अजीवन रक्त मोफत, नातेवाईकास एक वर्ष रक्त मोफत देण्यात आला, हे शिबीर.... या रक्तपेढीच्या सहकार्याने घेण्यात आले, अशी माहिती राहुल कलाटे यांनी दिली.

### या ठिकाणी झाला महायज्ञ !

» कोकणे चौक रहाटणी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर गावडे- भोईर आळी चिंचवड, मनपा शाळा वाकड, मल्हार मार्केट विकासनगर, गणेश मंदिर शिंदेवस्ती चौक रावेत, सूर्यमुखी गणेश मंदिर पडवळनगर थेरगाव, ज्येष्ठ नागरिक संघ कार्यालय साई चौक नवीसांगवी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर नढेनगर, तुळजाभवानी मंदिर शिव नगरी बिजलीनगर, आबासाहेब पवारनगर गल्ली नं २ द्रोण पार्क जुनी सांगवी.

# 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' अभियानाचा शुभारंभ

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते शुभारंभ : मोहिमेचा चित्ररथ तसेच सेल्फी बूथ सर्वांच्या आकर्षणाचा विषय



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' या महत्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या शुभहस्ते १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पिंपरी येथील महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात पार पडला. ध्वजारोहण सोहळ्यापाठोपाठ झालेल्या या कार्यक्रमादरम्यान प्रदर्शित करण्यात आलेला 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' जनजागरण मोहिमेचा चित्ररथ तसेच सेल्फी बूथ सर्वांच्या आकर्षणाचा विषय ठरला.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, मुख्य लेखापरिक्षक प्रमोद भोसले, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उपआयुक्त विठ्ठल जोशी, मनोज लोणकर, संदीप खोत, रविकिरण घोडके, अण्णा बोदडे, निलेश भदाणे, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, ज्ञानदेव जुंधारे, प्रमोद ओंभासे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, पंकज पाटील, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, ज्येष्ठ वैदयकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, ऋतुजा लोखंडे, शैलजा भावसार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उप अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, कर्मचारी महासंघाच्या चारूशीला जोशी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, महापालिका कर्मचारी आदी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध उपाययोजना, उपक्रम, प्रकल्प यामध्ये नागरिकांचा सहभाग असणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' या उपक्रमाच्या माध्यमातून महापालिकेस रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि सार्वजनिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी किंवा नव्याने मागणी करण्यासाठी मदत होणार आहे. यापूर्वी अर्ज जमा करण्यासाठी नागरिकांना महापालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयांना भेट द्यावी लागत असे. त्याऐवजी २०२४ या आर्थिक वर्षापासून "पीसीएमसी स्मार्ट सारथी" या मोबाईल ॲपवर आता नागरिकांना त्यांच्या अपेक्षा, सूचना, कल्पना ऑनलाईन घर बसल्या नोंदवता येणार आहेत.

या जनजागरण मोहिमेमध्ये वृत्तपत्रे, रेडिओ, व्हीएमडी बोर्डस याखेरीज सोशल मीडियाचा देखील वापर प्रभावीपणे केला जाणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# पुणेकरांना स्वातंत्र्यदिनी आगळेवेगळी भेट!

## सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपूल खुला : उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांची उपस्थिती



**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील रस्ते, उड्डाणपुलांची कामे करून नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्याकरीता प्रयत्नशील आहे, याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासन, नागरिकांना विश्वासात घेऊन कामे करण्यात येत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

पुणे महानगरपालिकेच्यावतीने सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल चौकात उभारण्यात आलेल्या नवीन उड्डाणपुलाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., मुख्य अभियंता युवराज देशमुख आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, राज्य सरकारच्यावतीने केंद्रशासनाकडून राज्याच्या विकासाकरीता मोठ्या प्रमाणात निधी आण्याचे काम करण्यात येत आहे. राज्यात रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. राज्यात सुरू असलेल्या प्रकल्पांना गती देण्याकरीता उपमुख्यमंत्री कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. विकास कामे करतांना पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, पुणे महानगर विकास प्राधिकरण, कॅम्प आदी यंत्रणेत समन्वय साधून कामे करावी लागतात. पुणे व पिंपरी चिंचवड शहरात विविध भागात मेट्रोचे जाळे निर्माण करण्यात येत आहे.

यापूर्वीदेखील चांदणी चौकातील पुल उभारुन वाहतूक कोंडी प्रश्न मार्गी लावण्यात आला आहे. पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे लोकार्पण करण्यात आले आहे. बाह्यवळण मार्गाला गती देण्याचे काम सुरू आहे. सिंहगड रोडवरील नाट्यगृहाचे काम प्रगतीपथावर असून येत्या वर्षभरात ते पूर्ण करण्यात येईल, याकरीता ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

पुण्याच्या लोकसंख्येत वाढ होत असून पाणी, वाहतूक अशा विविध पायाभूत समस्या निर्माण होऊन नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे पुणेकरांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, त्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होऊन ते इच्छितस्थळी वेळेत पोहोचले पाहिजे, याकरीता प्रशासन प्रयत्नशील आहे नागरिकांना वाहतुक कोंडीचा त्रास कमी करण्याकरीता प्रशासन प्रयत्नशील आहे. येत्या काळात वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्याकरीता आढावा बैठक घेण्यात येईल.

खडकवासला धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे सिंहगड रोडवरील काही भागात पुरपरिस्थिती निर्माण होते. नागरिकांची गैरसोय टाळण्याकरीता या भागात कायमस्वरुपी मार्ग काढण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे. पुणे महानगरपालिकेने एकतानगर येथील सामूहिक विकास क्षेत्राविषयी (कलस्टर डेव्हल्पमेंट) सादर केलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेण्यात येणार आहे. बांधकाम क्षेत्रातील व्यक्तींनी कामे करतांना राडारोडा नदीपात्रात टाकू नये. नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण करणारे बांधकाम करु नये, असे आवाहन पवार यांनी केले.

# पुणेकरांना पीएमपी बसचे लोकेशन पाहता येणार

## 15 ऑगस्टला 'आपली पीएमपीएमएल' ॲपचे उद्घाटन : 17 ऑगस्टपासून प्रवाशांच्या सेवेत



**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांची जीवनवाहिनी म्हणून काम करणाऱ्या पीएमपी बसची वाट पाहण्याची एक वेगळीच मजा आहे. मात्र, धावपळीच्या युगात आता कोणाला वाट पाहण्याची सवय राहिली नाही. अगदी वेळेला सर्व गोष्टी हव्या आहेत. त्यामुळे पीएमपी बसची देखील आता वाट पाहावी लागणार नाही. कारण घर बसल्याच पीएमपी बसचे लोकेशन पाहता येणार आहे. तसेच तिकीटही घेता येणार आहे. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर पीएमपी प्रशासने डिजिटल युगासोबत जाण्याचा निर्णय घेत 'आपली पीएमपीएमएल' ॲप प्रवाशांच्या सेवेसाठी आणले आहे. त्यामुळे प्रवाशांचा मोठा त्रास वाचणार आहे.

'आपली पीएमपीएमएल' या मोबाईल ॲपचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. उद्घाटनानंतर हे मोबाईल ॲप १७ ऑगस्ट २०२४ पासून सुरू प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. हे मोबाईल ॲप हे गुगल प्ले स्टोअर वर आपली पीएमपीएल (APLI PMPML) या नावाने उपलब्ध असून ॲन्ड्रॉईड मोबाईल मध्ये डाऊनलोड करता येईल.

पीएमपी बसने प्रवास करायचा असेल तर घरातून बाहेर पडण्यापूर्वीच बसचे लोकेशन, बसस्टॉपवर येण्यास लागणारा वेळ आणि घरबसल्याच तिकीट काढण्याची सुविधा पीएमपी 'गो ॲप' च्या माध्यमातून मिळणार आहे. या ॲपचा वापर जास्तीत जास्त प्रवाशांनी या मोबाईल ॲपचा वापर करावा असे आवाहन पीएमपी प्रशासनाने केले आहे.

पीएमपीकडून ऑक्टोबर २०२३ अखेर मोबाईल ॲप सुरु करण्याचे नियोजन आखण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा १ नोव्हेंबर २०२३ला ॲप सुरु होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले होते. मात्र आता हे ॲप तांत्रिक अडणीत अडकले होते. त्यानंतर पुन्हा या ॲपची चर्चा थांबली होती. मात्र अखेर तब्बल १० महिन्यांनी ॲपच्या उद्घाटला मुहूर्त मिळाला आहे.

पीएमपीचे तत्कालीन सचिन्द्र प्रताप सिंह यांनी मोबाईल ॲप सुरु करण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यांच्या आदेशाने यंत्रणा कामाला लागली होती. मात्र अध्यक्षांची बदली होताच यंत्रणा थंडावली. हे ॲप तांत्रिक अडचणीत अडकले असल्याचे सांगितले जात होते. ॲपचे सादरीकरण करताना थोडक्यात माहिती सादर केली होती. प्रवाशांना हव्या असलेल्या सुविधा त्यात दिलेल्या नव्हत्या. त्यामुळे पुन्हा याचा विचार केला जात होता. ॲपमध्ये प्रवाशांच्या सुविधांचा त्यात समावेश केला जाणार होता. यामुळे वेळ लागणार असल्याचे प्रशासानाकडूने स्पष्ट केले होते. अखेर ॲप सुरु केल्यामुळे आता प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

### 'आपली पीएमपीएमएल' या मोबाईल ॲपचे फायदे...

- प्रवाशांना त्यांच्या करंट लोकेशन वरून इच्छित स्थळी जाणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बसमार्गाची माहिती मोबाईल ॲपवर समजणार.
- मोबाईल ॲप मधून बसचे लाईव्ह लोकेशन प्रवाशांना दिसणार आहे. यामुळे बस थांब्यावर किती वेळात येणार हे देखील समजणे शक्य होणार आहे. थोडक्यात बसचे लाईव्ह ट्रॅकिंग होणार आहे.
- मोबाईल ॲप वरून प्रवाशांना ऑनलाईन तिकीट युपीआय द्वारे बुक करता येईल.
- या मोबाईल ॲप वरून प्रवाशांना ४०, ५० व १२० रुपयांचे दैनंदिन पास काढता येणार आहेत.
- मोबाईल ॲप वरून प्रवाशांना त्यांच्या तक्रारी देखील नोंदविता येणार आहेत.
- मोबाईल ॲप वरून मेट्रो तिकीट देखील काढता येणार आहे.